# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, गडचिरोली

जिल्हा परिषद हायस्कूल परिसर, चामोर्शी रोड

गडचिरोली 442605

फोन नं 07132- 295473

Email: dietgadchiroli@maa.ac.in


जा.क्र/जि.शिवप्रसंगड/MITRA उपक्रम/५३२/२०२६ | दिनांक : ३०.०७.२०२७

प्रति,

गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती (सर्व)

**विषय : MITRA (Mind In Training for Right Awareness) आनापान कार्यशाळा आयोजनाबाबत.**

**संदर्भ :** १) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण 2011 (296/11) माशि-3, दि. 5 आक्टोबर, 2011 आणि 27/01/2012
२) मा. आयुक्त (शिक्षण) म.रा. पुणे यांचे पत्र जा.क्र./ शिक्षण आयुक्ता/ विप, स/2020-21/43, दि 08 डिसेंबर, 2020
३) कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचे पत्र क्रमांक:- संकीर्ण-2026 /प्र.क्र.78/एस. डी. 4 दि.08 मे, 2026
४) मा. संचालक, रा. शै; सं.व प्र. प., महाराष्ट्र,पुणे यांचे SCERT-46.0/23/2026-ART & SPORTS /1892898/2026 दि. 2.05.2026
५) मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे यांचे परिपत्रक जा.क्र.राशैसंप्रप/ कलाव क्रीडा/मित्रउपक्रमप्रशिक्षण /२०२६-२७ दिनांक : 29.05.2026

उपरोक्त संदर्भीय विषयी राज्यातील सर्व शाळांमध्ये इयत्ता ५ वी ते १० / १२ वी च्या वर्गाकरिता मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधना वर्ग सुरु करण्यात आलेले आहेत. हा उपक्रम राबविणे सुलभ व्हावे यासाठी इयत्ता ५ वी ते १० / १२ वी च्या विद्यार्थ्यांचे प्रत्येक दिवशी शाळा सुरु होतांना परीपाठाच्या नंतरचे १० मिनिटे आनापान साधनेचा सराव घेणे क्रमप्राप्त आहे.

सर्व शाळांमध्ये 10 दिवसांचे विपश्यना तसेच 1 दिवसाचे मित्र उपक्रमाचे प्रशिक्षण पूर्ण केलेला एक शिक्षक उपलब्ध होण्यासाठी खूप कालावधी लागू शकतो. ही बाब विचारात घेऊन जिल्हा व तालुका स्तरावर प्रत्येक शाळेतील किमान एक शिक्षक प्राधान्याने मुख्याध्यापकास मित्र उपक्रमाचे ३ तासाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यानुसार अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे.

शासन परिपत्रकातील सर्व सूचना विचारात घेऊन हा उपक्रम राज्यातील सर्व शाळांमध्ये राबविणे सुलभ व्हावे, जेणेकरून काळानुरूप या उपक्रमाच्या अंमलबजावणीत आलेली शिथिलता, काही ठिकाणी पडलेला खंड, बदलत्या शैक्षणिक व्यवस्थेमुळे निर्माण झालेली आव्हाने सक्षमपणे पेलवता येतील. त्यानुषंगाने **मित्र उपक्रमाची सातत्यपूर्ण अंमलबजावणी करणेकरिता जिल्ह्यातील सर्व केंद्रप्रमुख यांची कार्यशाळा दिनांक : ०८.०६.२०२६** ला आयोजित करण्यात येत आहे.

**दिनांक : ०८.०६.२०२६ स्थळ : सभागृह, जिल्हा परिषद हायस्कूल गडचिरोली वेळ : सकाळी १०.३० वाजता**

**वेळापत्रक**

| वेळ | विषय | मार्गदर्शक | वेळ | विषय | मार्गदर्शक |
|---|---|---|---|---|---|
| १०.३०-११.०० | अल्पोपहार | - | ११.००-२.०० | आनापान साधना | तज्ञ (मित्र समन्वयक) |
| २.००-२.३० | भोजन | - | २.३०-५.०० | शैक्षणिक गुणवत्ता – चर्चा व सादरीकरण | श्री धनंजय चापले प्राचार्य, डायट, गड. |

सबब आपणास याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद गडचिरोली

(धनंजय चापले)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
गडचिरोली

Scanned with OKEN Scanner

प्रतिलिपी : माहितीस सविनय सादर.

१) मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे

२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली

उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित

३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद गडचिरोली

४) ~~प्रस्तुत कार्यालय~~ श्री पाटील सर, मित्र उपक्रम समन्वयक, गडचिरोली

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद गडचिरोली

(धनंजय चापले)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
गडचिरोली

Scanned with OKEN Scanner